हायकोर्टाचा निर्वाळा; हाणामारीत महिलेचे केस ओढल्यास हेतू स्पष्ट व्हावा

केस ओढणे विनयभंग नव्हे

मुंबई, (वा.) हाणामारीत महिलेचे केस ओढणे विनयभंग होत नाही. विनयभंगात हेतू स्पष्ट व्हायला हवा, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. महिलेला लज्जा येईल असे कृत्य म्हणजे वियनभंग होते. हाणामारीत महिलेचे केस ओढणे किंवा तिला ढकलणे, या कृत्याने कोणत्याही प्रकारची लज्जा येत नाही. हा हाणामारीचा भाग आहे. त्यासाठी मारहाणीचा गुन्हा दाखल होऊ शकतो. अशा प्रकरणात विनयभंगाच्या गुन्ह्याचा समावेश केला जाऊ शकत नाही, असे न्या. रेवती मोहिते - डेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

आरोपींनी महिलेचे केसे ओढले. तिला धक्काबुकी केली. महिलेने तसे जबाबात सांगितले आहे. आरोपींविरोधात विनयभंगाचे कलम ३५४ अंतर्गत गुन्हा नोंदवण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्याचे वकील अनिकेत निकम यांनी केली. केस ओढणे किंवा धक्काबुकी विनयभंगाच्या व्याख्येत येत नाही. तसे महिलेनेदेखील जबाबात म्हटलेले नाही. विनयभंगासाठी हेतू स्पष्ट व्हायला हवा, असे नमूद करत खंडपीठाने याचिकाकर्त्याची मागणी फेटाळून लावली.

ओशिवरा येथील नितीन उपाध्याय यांनी ही याचिका केली होती. धीरेंद्र शास्त्री (बागेश्वरबाबा) यांना मी ओळखतो. त्यांच्या एका कार्यक्रमासाठी मी गाडी दिली होती.

त्यानंतर त्यांचे अनुयायी अभिजित करंजुळे, मयूरेश कुलकर्णी, ईश्वर गुंजाळ, अविनाश पांडे व लक्ष्मण पंत हे घरी आले. पैसे मागण्यावरून एक वाद झाला होता. यावरून त्यांनी मला धमकावले. माझ्या पत्नीचे केस ओढले. तिला हाताला पकडून ओढत नेले. मला मारहाण केली. पोलिसांनी या सर्वांविरोधात केवळ मारहाणीचा गुन्हा नोंदवला. या आरोपींविरोधात विनयभंगाचा गुन्हा नोंदवावा. याचा तपास सीआयडीकडे सोपवावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. ही याचिका न्यायालयाने फेटाळून लावली.

घटना घडल्यानंतर उपाध्याय यांच्या पत्नीचा जबाब

- घटना घडल्यानंतर उपाध्याय यांच्या पत्नीचा जबाब पोलिसांनी घेतला होता. याचिका दाखल झाल्यानंतर उपाध्याय यांच्या पत्नीचा पुरवणी जबाब घेण्यात आला.
- महिला अधिकाऱ्यासमोर हा जबाब घेण्यात आला. केस ओढले व हात धरून ओढून नेले, असे उपाध्याय यांच्या पत्नीने सांगितले. विनयभंगाबाबत काहीही सांगितले नाही.
- त्यामुळे विनयभंगाचा गुन्हा नोंदवलेला नाही, असे सरकारी वकील कुमार सस्ते यांनी न्यायालयाला सांगितले. सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक रमेश केंगार यांनी केला.

बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेसाठी कृती करा...

मुंबई, (वा.) 'बांगलादेशात आरक्षणाच्या सूत्रावरून सरकारविरोधी आंदोलनात झालेल्या हिंसाचारामुळे तेथे अराजक माजले आहे. या सरकारविरोधी आंदोलनात जिहादी आणि कट्टरतावादी जाणीवपूर्वक हिंदूंना लक्ष्य करून त्यांच्या उघडपणे हत्या करत आहेत. हिंदु महिलांवर बलात्कार करणे, हिंदूंची घरे आणि दुकानांवर आक्रमणे करून ते लुटणे, हिंदूंच्या मंदिरांची तोडफोड करणे-आग लावणे, हिंदूंना विस्थापित करणे आदी अत्याचार केले जात आहे. बांगलादेशात हिंदूंचा नरसंहार होत आहे आणि तेथील अल्पसंख्यांक हिंदूंमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण अजूनही आहे. बांगलादेशमधील हिंदूंची विदारक स्थिती पाहता हिंदूंच्या रक्षणासाठी आणि बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार थांबवून त्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी भारत सरकारने तातडीने कृती करावी' अशी आग्रही मागणी 'हिंदु राष्ट्र समन्वय समिती'च्या वतीने आयोजित 'हिंदु-राष्ट्र जागृती आंदोलना'त करण्यात आली.

देशमुख यांचे ट्विट

मुंबई : 'वा देवेंद्र फडणवीस! तुम्ही ३ वर्षांपूर्वी कसे उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे यांना तुरुगांत टाकण्यासाठी कटकारस्थान रचले होते, ते मी महाराष्ट्राच्या जनतेसमोर आणले. आता दोघेही देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरुन पोपटा सारखे बोलत आहे, असे अनिल देशमुख यांनी ट्विटच्या माध्यमातून सांगितले आहे.'आम्ही परमवीर सिंगला ३ वर्षांपूर्वी निलंबित केले होते. त्याला ३ वर्षापूर्वी केंद्रीय एजन्सीकडून अटक होणार होती. पण तो भाजपाला शरण गेला आणि आता देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे आरोप करीत आहे', असे अनिल देशमुख यांनी म्हटले. ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, तुम्ही १५ दिवस का शांत होता? आता माझ्यावर आरोप करायाचे तुम्हाला आठवले काय? असा सवालही देशमुख यांनी ट्विटद्वारे विचारला आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे
PUNE METROPOLIS
नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- ४११०४४
Email: pune-metroline3@pmrda.gov.in

ई-निविदा नोटीस क्र. ०४ सन २०२४-२५

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे ई-निविदेद्वारे **"मेट्रो मार्गीकेतील माण ते शिवाजीनगर दरम्यानच्या स्थानक क्र. १ ते स्थानक क्र. २३ पर्यंत आवश्यकतेनुसार मेट्रा ROW लगत रस्त्याची व पादचारी मार्गाची देखभाल व दुरुस्ती कामे करणे"** या कामासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त निविदा दस्ताऐवज www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. १३/०८/२०२४ दुपारी ३:०० वा. पासून डाउनलोड करता येईल. सदर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २८/८/२०२४ दुपारी ३:०० वा. पर्यंत आहे. कोणताही बदल www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

सही/-
(रिनाज पठाण)
मुख्य अभियंता, (अ.वि. -२)
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

DGIPR 2024-25/1845

ऑनलाईन शेअर ट्रेडिंगमध्ये ४४ लाखांचा घोटाळा

मुंबई, (वा.) नुकतीच एक ३९ वर्षीय महिला ऑनलाइन शेअर ट्रेडिंगच्या घोटाळ्याची बळी ठरली आहे. फेसबुकवरील एका जाहिरातीला प्रतिसाद दिल्यानंतर त्यांचे सुमारे ४४ लाखांचे नुकसान झाले. पीडित महिला, तिचा नवरा सार्वजनिक क्षेत्रातील बँकेत व्यवस्थापक आहे, सुरुवातीला लक्षणीय नफ्याचे आश्वासन देऊन संधीकडे आकर्षित झाली. मात्र, गुंडांचा बळी गेल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार, फेसबुकच्या जाहिरातीवरील' आमच्याशी संपर्क साधा' बटणावर क्लिक केल्यानंतर तिला प्रथम हा घोटाळा समोर आला. त्यानंतर ती सुनीता सिंग नावाच्या महिलेशी जुळली. शेअर ट्रेडिंगमध्ये एक विश्वासार्ह सूत्रधार म्हणून स्वतःची ओळख करून दिली होती. सुनीताने त्या महिलेला आश्वासन दिले की जर तिने त्याच्यामार्फत गुंतवणूक केली तर तिला १०० टक्के नफा मिळेल आणि दावा केला की त्याची टीम कोणत्याही नुकसानीची भरपाई करेल. ज्या छोट्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये त्याला जोडण्यात आले होते त्यात फक्त चार सदस्य होते, ज्याचे व्यवस्थापन आदित्य सक्सेना नावाच्या व्यक्तीने केले होते.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मातंग समाजाची बैठक

मुंबई. महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकांच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. बैठका आणि दौरे करण्यावर भर दिला जात असून तर दुसरीकडे आरक्षणाच्या मुद्द्यावर देखील लक्ष्य दिले जात आहे . मुंबईतून मातंग समाज देखील आता विधानसभा निवडणुकीत आपली ताकद पणाला लावण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहे. नुकतेच ओबेरोय हाटेल या ठिकाणी मातंग समाजाची एक बेठक संपन्न झाली. बेठकीत मुंबईतील मातंग समाज , समाजातील नेते व कार्यकरते यांची एकी करणे तसेच येणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीत मुंबईतील मातंग समाजाची भूमिका ठरवणे या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीत सर्वांच्या सहमतीने ठराव घेऊन मुंबई मातंग ऐक्य आंदोलन या नावाला सहमती दर्शवण्यात आली.

बिबट्याच्या कातड्याची तस्करी करणाऱ्याला अटक

मुंबई, (वा.) बिबट्याचे कातडे विकण्यासाठी आलेल्या एक आरोपीला गुन्हे शाखेचे अधिकाऱ्यांनी घाटकोपरच्या विद्याविहार परिसरातून अटक केली आहे. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी दोन लाख रुपये किमतीचे हे कातडे जप्त केले असून पोलीस त्याच्याकडे याबाबत अधिक तपास करत आहेत.

विद्याविहार रेल्वे स्थानक परिसरातील एका इमारतीमध्ये एक इसम बिबट्याच्या कातड्याची तस्करी करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा परिमंडळ पाचच्या अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार अधिकाऱ्यांनी गुरुवारी दुपारी विद्याविहार स्थानक परिसरातील या इमारतीमध्ये सापळा रचला. मिळालेल्या वर्णनाचा इसम त्या ठिकाणी येताच पोलिसांनी झडप घालून त्याला ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ असलेल्या बॅगेमध्ये पोलिसांना हे कातडे मिळून आले आहे. गणेश रहाटे (५५) असे या आरोपीचे नाव असून तो प्रभादेवी परिसरातील राहणारा आहे.

एका खासगी कंपनीत रहाटे सेल्समनचे काम असून त्याच्यावर पोलिसांनी विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये त्याच्यासोबत आणखी काही साथीदार असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून त्यानुसार पोलीस त्याच्याकडे याबाबत अधिक तपास करत आहेत.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील गोएल गंगा व्हेंचर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत एक कंपनी, त्यांचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर U45201PN2020PTC192067 व नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : एफ.एम. ऑफिस, लोढा बेल्मोंडो, मावळ, गहुंजे, पुणे, वडगाव (पुणे), पुणे, मावळ, महाराष्ट्र, भारत - ४१२१०६, त्यांचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता श्री. तुषार येवले (**"हस्तांतरिती"**) यांच्या माध्यमातून हे पुणे महानगरपालिकेकडून (**"पीएमसी"**), मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स, पॅन AAIFB4222B एक भागीदारी संस्था, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता : शॉप नं. ३, शाणूर कॉम्प्लेक्स, सीटीएस क्र. ५१४, भवानी पेठ, पुणे - ४११ ०००२ (**"हस्तांतरक"**) यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या विकास हक्क प्रमाणपत्र क्र. ००४७२०, दि. ०५.०६.२०२४ (**"डीआरसी"**) अंर्गत उपलब्ध एकूण ११९०६.७३ चौ. मी. (**"एकूण टीडीआर"**) पैकी ७४४०.०० चौ. मी. क्षेत्रफळाच्या हस्तांतरणयोग्य विकास हक्कांची (**"टीडीआर"**) खरेदी करू इच्छित आहेत. सदर जाहीर सूचनेच्या तारखेस, हस्तांतरक यांनी हस्तांतरिती यांना असे सादरीकण दिले आहे की एकूण टीडीआरपैकी नमूद टीडीआर हे सर्व भारांपासून मुक्त आहेत व त्यांसंदर्भात कोणत्याही तिसऱ्या पक्षकारांचे हक्क निर्मित नाहीत.

कोणीही व्यक्ती/घटक यांचा सदर डीआरसी वा त्याच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, विनिमय, परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, अनुज्ञप्ती, लिव्ह अँन्ड लायसेन्स, देखभाल तत्त्वावर, वहिवाट, उप-वहिवाट, अभिहस्तांकन, विमोचन, परित्याग, गहाण, उत्तराधिकार, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, स्मारक, ताबा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, दावा खटला वा अन्य कोणताही करार, व्यवहार, कागदपत्रे, लिखापढी, अभिहस्तांकन करार, इच्छापत्र यांअंतर्गतकोणत्याही स्वरूपात वा कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा आदेश, कंत्राटे/करार, विकास हक्क, भागीदारी, एफएसआय उपभोग वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, दावा, हरकत, लाभ, मागणी व /वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्यांसहित अधोहस्ताक्षरितांना खालील निर्देशित पत्त्यावर सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा व्यक्ती/घटकांचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित, परित्यागित, सोडून दिलेले व /वा रद्द समजण्यात येतील.

सही/-
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२४
(के. पी. महाजन)
वकील, मुंबई हायकोर्ट

३७० कलम हटवल्याने काश्मीरमध्ये रोजगारात वाढ

मुंबई, (वा.) कलम ३७० हटवल्यामुळे जम्मू काश्मीरमध्ये सध्या उद्योग आणि रोजगार वाढत आहेत, असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले. त्यांनी जम्मू काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेतली. त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. त्यानंतर त्यांनी आपले मत नोंदवले. मनोज सिन्हा यांच्या या सदिच्छा भेटीत आठवले यांनी जम्मू-काश्मीरच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडींवर चर्चा केली. केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे विविध योजनांच्या माध्यमातून जम्मू काश्मीरमधील जनतेचा विकास घडविण्याबाबतचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

Maharashtra State Road Transport Corporation
Central Workshop Dapodi Pune - 411012,
Phone : 020-29970832 | E-mail: wmstcwd@gmail.com

No. राप/मकादा/उत्पा/दुरुस्ती/२०८०३ दिनांक : १२/०८/२०२४

Works manager M.S.R.T.C.S.T. CWD PUNE invites Open Tender from Firms for Electric motor rewinding as per requirement. The interested firms shall visit to M.S.R.T.C. ST CW Dapodi PUNE-12. Interested firms should send their valued quotation on or before 16/08/2024 at 14.00 Hrs positively super scribing on the above subject. The quotation box has kept at M.S.R.T.C.S.T CW Dapodi PUNE conference hall. On the envelope write as quotation for repairs to "Electric motor rewinding as per requirement".

Sd/-
Works Manager S.T. CWD Pune-12

खारफुटीच्या जमिनीवर मलबा फेकणाऱ्यावर गुन्हा

मुंबई, वर्सोवा जेट्टीजवळील खारफुटीमध्ये रात्रीच्या वेळी मलबा फेकल्याप्रकरणी वर्सोवा पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मार्च ते जुलै २०२४या कालावधीत वर्सोवा गावाजवळील सरकारी जमिनीवर ५० मीटर क्षेत्रफळावर ढिगारा टाकण्यात आला होता. अंधेरीचे विभागीय अधिकारी हेमंत वरकळीकर यांनी खारफुटीमध्ये कचरा टाकल्याबद्दल पर्यावरणवादी स्टॅलिन डी यांनी ५ जुलै रोजी गुन्हा दाखल केला होता.

महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)
ई लिलाव विक्री सूचना

मे. महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात) यांच्या मालकीच्या प्लांट आणि मशिनरी यांची विक्री, इंसॉल्व्हेंसी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (अवसायन प्रक्रिया) अधिनियम २०१६ च्या नियम ३२ आणि ३३ च्या अनुसार. विक्री प्रक्रिया ही निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडून इ लिलाव व्यासपीठ : https://right2vote.in/login यांच्या माध्यमातून आयबीबीआय (अवसायन प्रक्रिया) अधिनियम २०१६ चे परिशिष्ट १ च्या अनुसार खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार घेण्यात येणार आहे.

मालमत्ता	तपशील	राखीव किंमत (रु)	ईएमडी रक्कम (रु)
जमीन आणि इमारत	**फ्रीहोल्ड जमीन आणि फॅक्टरी इमारत पत्ता :** गट क्रमांक २६७ (भाग) आणि २६८ मौजे कोलवाडी, भोर, जिल्हा पुणे,महाराष्ट्र ४१२ २१३.	रु. २,७९,०५,६६५.००	रु. २,७९,०५६.६५

ई- लिलावाची तारीख आणि वेळ : १३ सप्टेंबर २०२४, दुपारी १२. ३० ते दु. २. ३०
भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार
ई मेल आयडी : macpl.cirpgmail.com ; मोबाईल क्रमांक : + ९१ ९९३०३३११४६
ई लिलाव सेवा पुरवठादार : राईट २ व्होट इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड
ई लिलावाच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार आहेत

१. ई-लिलाव **जसे आहे जिथे आहे, जे आहे ते आहे आणि जे आहे तसे आहे. तत्वावर** मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मेसर्स राईट २ व्होट इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. ई-लिलाव सूचना संपूर्ण इ लिलाव प्रक्रिया माहिती प्रपत्र ज्यात मालमत्तेच्या संपूर्ण माहितीचा समावेश आहे, इ लिलाव बोली प्रपत्र, डिक्लरेशन आणि इ लिलावाच्या सामान्य अटी आणि शर्ती यांचा समावेश आहे त्यासह वाचले जावी आणि ही प्रपत्रे मोबाईल क्रमांक **+ ९१ ९९३०३३११४६,** ई मेल आयडी **macpl.cirpgmail.com** सोमवार ते शुक्रवार येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आणि इ लिलाव सेवा पुरवठादार यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

२. मालमत्तेच्या संदर्भात संपूर्ण माहिती घेणे ही बोलीदार यांची जबाबदारी राहील आणि बोली सादर करण्याच्या पूर्वी संपूर्ण माहितीची खातरजमा बोलीदार यांनी करून घेणे आवश्यक आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी मालमत्तेच्या ठिकाणी करण्याची परवानगी संबंधित बोलीदारांना, हे सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून प्रपत्रे आणि ईएमडी सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत देण्यात येईल.

३. इच्छूक बोलीदार यांनी ई लिलावासात सहभाग घेण्यासाठी आपले विनंतीपत्र तसेच केवायसी प्रपत्रे आणि अन्य प्रपत्रे सादर करणे आवश्यक आहे. संबंधित प्रपत्रांचा आराखडा आणि नमुना ई लिलाव प्रक्रिया माहिती प्रपत्रातून घेता येईल. ही प्रपत्रे अवसायक यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष स्वरूपात किंवा पोस्ट / कुरिअर यांच्या माध्यामातून वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या पत्त्यावर **१० सप्टेंबर २०२४** च्या पूर्वी प्राप्त होणे आवश्यक आहे. पात्र बोलीदार राखीव किमतीच्या **१०%** ईएमडी सादर केल्याचे पुरावे **१० सप्टेंबर २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करू शकतात.

४. इच्छूक बोलीदार यांनी ईएमडी रक्कम महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड - अवसायनात यांच्या आणावे काढलेल्या धनाकर्षच्या माध्यमातून भरणा करणे आवश्यक आहे.

५. बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या बोली सादर करण्याच्या पूर्वी आणि ई लिलाव विक्री प्रक्रियेत सहभाग घेण्याच्या पूर्वी ई लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी https ://right2vote.in येथे भेट द्यावी.

दिनांक : १३.०८.२०२४ **आयपी अशोक मित्तल**
स्थळ : पुणे **अवसायक**
महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)
नोंदणी क्रमांक : आयबीबीआय / आयपीए -००१/ आयपी - पी -०२५४९/२०२१-२०२२/ १३८८९
पत्ता : एस - १३८, बी विंग, एक्सप्रेस झोन मॉल, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई उपनगर, महाराष्ट्र ४०० ०६३.

जाहीर सूचना

आम्ही, **मे. निवासा बिल्डकॉन** सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की **महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने** आमच्या सर्व्हे नंबर २४८/१/१/२, लोहगांव, तालुका हवेली, जिल्हा पुणे ४११०४७ येथील विस्तारित गृहप्रकल्पाला दिनांक ०५/०३/२०२४ रोजी पत्र क्रमांक **"IA/MH/IFRA2/462440/2024"** अन्वये पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या **www.ecmpcb.in** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मे. निवासा बिल्डकॉन

शुध्दीपत्रक

तमाम लोकांस या शुध्दीपत्रकाने कळविण्यात येते की, मी माझे अशीलातर्फे दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजीचे दैनिक नवराष्ट्र पुणे आवृत्ती मुख्य अंकातील पान नं. ७ वर प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसमध्ये टाईप करताना दोन ठिकाणी सचिन दिनकर बेलदार ऐवजी सचिन शिवाजी चव्हाण असे नमूद झालेले आहे. सबब ते सचिन दिनकर बेलदार असे दुरूस्त वाचावे.

येणेप्रमाणे शुध्दीपत्रक असे.
बारामती.
तारीख : १०/०८/२०२४
ॲड. विजय विनायक लोणकर
शॉप नं. २९, संघवी हाईटस्,
भिगवण रोड, बारामती, जि. पुणे.
मोबाईल - ९४२२५१३५२०

जाहीर नोटिस

बारामती येथील मे. एस. एस. सस्ते साहेब, तदर्थ जिल्हा न्यायाधीश - १, बारामती जि. पुणे यांचे न्यायालयात....

दिवाणी किरकोळ अर्ज १७७/२०२४ निशाणी क्र. ०६
कु. प्रेमराज धनंजय बंडगर तर्फे अपाक म्हणून वडील, श्री. धनंजय जालिंदर बंडगर, कु. आर्यन धनंजय बंडगर तर्फे अपाक म्हणून आई सौ. मनिषा धनंजय बंडगर, दोघे रा. कुंभारगांव ता. इंदापूर जि. पुणे } अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही } जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात हिंदू मायनर ॲण्ड गार्डियन्सशिप ॲक्ट कलम ८ व गार्डीयन ॲड वॉर्ड ॲक्ट कलम २९ अन्वये अ.पा.क. ची जमिन विक्रीस परवानगी मिळणे कामी मे. न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी, या मे. कोर्टाचे स्थळसिमेत अर्जदार यांचे अज्ञान मुलांचे नावावरील तुकडी पुणे पोट तुकडी ता. इंदापूर जि. पुणे मा. दुयम निबंधक सो, इंदापूर ता. इंदापूर यांचे हद्दीतील व जिल्हा परीषद पुणे तालुका व पंचायत समिती इंदापूर पैकी ग्रामपंचायत व मुळकी गाव मौजे कुभांरगांव ता. इंदापूर जि. पुणे येथील बागायत क्षेत्र गट नं. ८४/१ मधील अर्जदार नं. १ यांचे हिश्याचे पैकी ०० हे. १० आर क्षेत्र व अर्जदार नं. २ यांचे हिश्याचे पैकी ०० हे. १० आर क्षेत्र ही मिळकत. यांसी चतुःसिमा इंदापूर येथील रजिस्टर कार्यालय मध्ये नोंदविलेल्या दस्त नं. ४६३८ / २०२४ प्रमाणे आहेत.

येणे प्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णन केलेली शेती या अर्जाचा विषय असे. तरी अर्जदार यांच्या ताब्यात असलेले व नमूद क्षेत्र विक्री करणेकामी परवानगी मिळणेकामी अर्जदाराने या मे. न्यायालयात सदरचा अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी कोणास सदर अर्जदाराविरूध्द हरकती दाखवणेकरीता आपले म्हणणे मांडणे असल्यास या जाहिरनोटीसचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणी योग्य हरकती योग्य न दाखवल्यास तर अर्जदार यांच्या हक्काबद्दल लगलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरची क्षेत्र विक्री करण्यास परवानगी देण्यात येईल.

बारामती
दि. ८/८/२०२४
सही/-
अधिक्षक
जिल्हा सत्र न्यायालय, बारामती, पुणे
शिक्का

जाहीर नोटीस

तमाम जनतेस तथा विशेषकरुन सुपे पंचक्रोषी तसेच सुपे, ता. बारामती, जि. पुणे परिसरातील सर्व लोकांस हया जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,आमचे अशिल श्री. तुषार दत्तात्रय हिरवे वय 26 वर्षे, धंदा हॉटेल व्यवसाय कायमस्वरुपी रा. मु.पो. सुपे, ता. बारामती, जि. पुणे यांनी पुर्विलेल्या माहितीवरुन आणि दिलेल्या अधिकारपत्रान्वये सर्वांस सुचित करणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या चतुःसिमा पुर्वक जागेत आमचे अशिलांची आई कै. लता दत्तात्रय हिरवे हयांनी सन 2008 साली "हॉटेल स्वराज" सुपा (माळ) येथे शिरुर सातारा रस्त्याचे दक्षिणेस लगत सुपा सासवड रोड चौक (माळ) येथे सुरु केलेले होते व आहे. त्यांचे सन 2013 साली निधन झालेनंतर तेव्हापासून सदर हॉटेल अशिल सांभाळत व चालवत आहेत. सन 2016 साली सदर हॉटेलमध्ये अशिलांनी रितसर विज कनेक्शन सुध्दा घेतलेले आहे. सदर हॉटेल हे अगदी रस्त्यालगत असुन त्याचे मागे काही खाजगी लोकांचे प्लॉटस् आहेत. सदरचे हॉटेल आमचे अशिल त्यांचे आई हयात असताना त्या स्वतः व नंतर आजतागायत अशिल अशी सुमारे 16 वर्षे निरंतर शांततेत, विना अडथळा चालवित असून सदर हॉटेल त्यांचे उपजिविकेचे एकमेव साधन आहे व असलेने ते कायमस्वरुपी तेथे वास्तव्यास आहेत. अशातच गेल्या काही दिवसापासून हॉटेल मागील प्लॉटधारकांचा हवाला देवून काही अपरिचित व्यक्ती अशिलांस त्यांचे हॉटेल आमचे जागेत सरकुन बांधले आहे. खाजगी जागेत कथित अतिक्रमण केले आहे. अशा प्रकारे बोलून दिवाणी कारवाई करुन अशिलांचे हॉटेल पाडून टाकण्याची भाषा करतात व प्रत्यही करीत आहेत अशी खात्रीलायक माहिती अशिलास झाली आहे. सबब आमचे अशिलांची अशी वतावणी करणा-या सर्व अपरिचित वा कथित हितसंबंधितास हया जाहीर नोटीसद्वारे सुचना आहे की, आमचे अशिलांचे मालकीचे हॉटेल स्वराजचे एकंदरच सर्वंकष अस्तित्वास "विधीमान्य कायदेशीर प्राधिकारावाचून " कोणीही कोणत्याही स्वरुपाची आगळीक करु नये. याची सर्व जनतेने नोंद घ्यावी ही जाहीर नोटीस दिली. **परिशिष्ट :** वर्णन हॉटेल स्वराज (शाकाहारी उपहारगृह) सुपे, शिरुर- सातारा रस्त्यालगत सुपा सासवड रस्ता चौक (माळ). पुर्वेस-सारिका गोरे यांचे गणेश हॉटेल व मोकळी जागा, दक्षिणेस- सि.स.नं. 1163 व 1164 बिगर कंपाउंड प्लॉट, पश्चिमेस- रस्ता व मोकळी जागा, उत्तरेस- शिरुर सातारा हायवे व सुपा सासवड रोड चौक.

बारामती, दिनांक : 12/08/2024 स्वाक्षरी/-
शिक्का
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
ॲड. चंद्रशेखर रमेशराव जगताप
रमा शाकुंतल वाडा, रमाई चौक, दंडवाडी रस्ता, सुपे, ता. बारामती, जि. पुणे ४१२२०४, मो. ९८५०२८५८५५

जाहीर नोटिस

आमचे अशिल **श्री. बापुराव सखाराम नाळे** रा. डोलेंवाडी, ता. बारामती, जि. पुणे यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन तसेच दिलेल्या अधिकारावरुन तमाम लोकांना, हितसंबंधितांना विशेषतः उपरोक्त गावातील लोकांना हया जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत आमचे अशिलांची वडिलोपार्जित आहेत. अशिलांचे वडिलांचे मृत्यूपश्चात सदर मिळकतीस वारसाहक्क नोंदी प्रक्रियेद्वारे आमचे अशिलांसह **बंधु विठ्ठल, बहिणी रतन उर्फ रत्नमाला, अलका व ठकुबाई तसेच मयत बहिण पाचबाई हिची मुले रमेश, लता, आशाबाई, शोभा, सविता आणि आई कृष्णाबाई** यांची वारस नोंद डोलेंवाडी दप्तरी झाली. आमचे अशिलांस नुकतेच ज्ञात झाले की आमचे अशिल वगळता इतर वारसांनी दुय्यम निबंधक बारामती येथे दस्त क्र. ६१६४/२०२४ दि. ०५/०८/२०२४ रोजी फक्त विठ्ठल सखाराम नाळे यांचे लाभात हक्कसोडपत्र करुन दिले आहे, जे कायदयाने आमचे अशिलांवर बंधनकारक नाही. नमुद मिळकत अदयापी अविभाज्य स्वरुपात आहे. तिचे वाटप झालेले नाही, अशिल आणि विठ्ठल सदर मिळकत प्रत्येकी समान हिश्याने आजरोजी कब्जा वहिवाट राखून आहेत. सबब हक्कसोड पत्राने त्यातील आशयाचे अनुषंगाने विठ्ठल यांस जादाची मालकी कायदयाने प्राप्त होत नाही. हक्कसोड दस्त दाखवून, बनाव करुन विठ्ठल हा मिळकतीचे अनुषंगाने गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. सबब सदर मिळकतीचे अदयाप वाटप बाकी असलेने ते अदयापी अविभाज्य स्वरुपात आलेने कोणीही त्रयस्थांनी, हितसंबंधितांनी वा वित्तसंस्थांनी वहिवाट, विसार,